# DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE

BAR.SHESHRAO WANKHEDE
COLLEGE OF ARTS &COMMERCE
KHAPERKHEDA

# PPT ON KARL MARX

- PROF.DR.PRATIBHA  U GADWE (DATIR)
- HOD  POLITICAL SCIENCE
- M.A.M.PHIL.PH.D.B.ED.

# कार्ल मार्क्स चा द्वंद्वात्मक भौतिकवाद

# कार्ल मार्क्स

- पश्चिमात्य राजकीय विचारवंतातील साम्यवादी विचारवंत म्हणून कार्ल मार्क्स जगात अजरामर आहे.
- जन्म-. 1818 मध्ये जर्मनीत
- लहानपणापासून नास्तिक वादाचा प्रभाव होता .
- शालेय जीवनात शेतकरी कामगारांच्या मुलांचा सहवास लाभल्यामुळे त्यांच्या जीवनातील अडचणीचा त्याला अनुभव होता.

# मार्क्सचा द्‌वंद्‌वात्मक भौतिकवाद

- मार्क्स च्या विचारांवर हेगेल या आदर्शवादी विचारवंत, फ्रेंच विचारवंत सेंट सायमन, चार्लेस फेरीयर यांचा व त्याचा मित्र एंजल्स यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता.
- शास्त्रीय समाजवादाचा जनक
- साम्यवाद च्या जागतिक क्रांतीचा जनक
- प्रकांड विद्‌वान,साम्यवादाचा जनक सर्वहारा वर्गाचा हितचिंतक अश्या विविध स्वरुपात मार्क्स जगात प्रसिद्ध आहे.

# मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

ग्रंथ संपदा

मार्क्स ने आपल्या कारकिर्दीत समाजवाद आणि आर्थिक विचारांशी सबधित अनेक ग्रंथांची रचना केली काही ग्रंथं मार्क्स व एंजल्स या दोघांनी मिळून लिहले.

होली फॅमिली

कम्यूनिस्ट मेनिफेस्टो

दास कॅपिटल

दी पोवेर्टी ऑफ फिलॉसफी हे काही महत्वाचे ग्रंथ होत.

# मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

- कार्ल मार्क्स च्या संपूर्ण लिखाणाचा आधार **द्वंद्वात्मक** भौतिकवाद **आहे. व ही कल्पना त्याने हेगेल च्या द्वंद्वादाच्या सिद्धातातून घेतली. परंतु मार्क्स चा द्वंद्वाद हेगेल पेक्षा वेगळा आहे. हेगेलच्या द्वंद्वादाचा आधार विचार आहे तर मार्क्स च्या दवंद्वादाचा आधार भौतिक पदार्थ आहे.हेगेल श्रुस्टी मध्ये होणाऱ्या परिवर्तनाचे कारण विचार आहे असे मानतो. तर मार्क्स च्या मते परिवर्तन हे विचारांमुळे होत नसून] त्यासाठी आर्थिक घटक कारणीभूत असता.**

# मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

- मार्क्सने भौतिक पदार्थाला जगाचा आधार मानले आहे.त्याच्या मते विचारावरून भौतिक जीवन ठरत नसून व्यक्तीचे भौतिक जीवनातील स्थानावरून तिचे विचार ठरत असतात. भौतिक जगातील प्रत्तेक वस्तु गतिशील असून तिच्यात सतत परिवर्तन होत असते.व या परीवर्तनातून विकास घडतो

# मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

- तो वाद-प्रतिवाद-संवाद या तीन अवस्थांतून होत असतो.जगात भौतिक वस्तु व निसर्ग यांच्या द्वंद्वातून जुन्या वस्तूंचा नाश व नव्याची निर्मिती असा हा विकास असतो.यालाच विरोध विकासवाद असे मार्क्स म्हणतो.
- हेच तत्व समाजव्यवस्थेला लागू करून मार्क्स च्या मते भौतिक साधंनांच्या आधारे निर्माण झालेल्या समाजातील परस्परविरोधी दोन वर्गाच्या संघर्षातून नवीन समाजरचना निर्माण होते. जी पूर्वीच्या तुलनेत अधिक चांगली असते.

- मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवादाची वैशीष्टे ---
- जगातील प्रत्तेक वस्तु गतिमान असते आणि तिच्यात सतत परिवर्तने होत असतात.
- जगाचा विकास विरोधातून होत असतो.भौतिक परिस्थिति किंवा वस्तूंच्या संघर्षातून जग विकासाप्रत जात असते
- भौतिक पदार्थात होणारे परिवर्तन मात्रात्मक व गुणात्मक अशा दोन्ही प्रकारचे असते.

- मार्क्सने भौतिक पदार्थांच्या आधारावर इतिहासाची मीमांसा केली आहे द्वंद्वात्मक भौतिकवादाचा उपयोग मार्क्स ने एतिहासिकव सामाजिक विकासाची व्याख्या करण्यासाठी केला. जगाचा व समाजाचा आजपर्यंतचा विकास कसा झाला असावा हा प्रश्न मार्क्स ला भेडसावत होता त्याने जगाच्या इतिहासाचा अभ्यास करून जगातील समाजाच्या विकासाचा आधार आर्थिक असल्याचे स्पष्ट केले. इतिहास निर्मितीसाठी भौतिक पदार्थ कारणीभूत ठरले असे मार्क्स म्हणतो. ज्याला मार्क्सचा एतिहासिक भौतिकवाद असे म्हंटले जाते.

# मार्क्सचा इतिहासिक भौतिकवाद -

- मार्क्स च्या मते मानवाचा इतिहास पुर्णपणे आर्थिक घटकाकडून नियंत्रित आणि निर्गमित केला जातो.उत्पादन क्षेत्रात झालेले बदल इतिहास बदलवतात उत्पादन साधनात बदल झाला की समाजातील जीवनपद्धतीवर त्याचा परिणाम होतो. वस्तूंची उत्पादनपद्धती मनुष्याच्या समाजातील क्रिया निश्चित करते.प्राचीन काळातील गुलामगिरीच्या तर आजच्या भांडवलशाही पर्यन्त समाजव्यवस्थ्येत जी परिवर्तने घडून आली त्यामागे उत्पादनातील बदलच कारणीभूत होते.

# मार्क्सचा द्‌वंद्‌वात्मक भौतिकवाद

- उत्पादनाच्या साधंनातील बदलाबरोबरच मनुष्यही बदलतो .जुन्या उत्पादनव्यवस्थेत त्याला विरोध करणारी नवीन उत्पादनपद्धती निर्माण होते. नंतर जुन्या नव्याचा संघर्ष होतो .ह्यामध्ये नवीन उत्पादनाची साधने श्रेष्ठ असतात.मार्क्स च्या इतिहासिक भौतिकवादानुसार उत्पादन आणि उत्पादनशक्ती एका निश्चित नियमांनुसार विकसित होतात. तो नियम म्हणजे द्‌वंद्‌ववाद  होय.वाद-प्रतिवाद-संवाद ह्या अवस्थामधून हा विकास होत जातो. मार्क्स च्या इतिहासिक भौतिकवादात धर्माला काहीही स्थान नाही.

# मार्क्सचा द्‌वंद्‌वात्मक भौतिकवाद

- आर्थिक आणि भौतिक परिस्थितीच्या आधारे कार्ल मार्क्स मानवी इतिहासाचे प्रमुख 5 कालखंड पाडतो.
- 1.आदिम अवस्था किंवा प्राचीन साम्यवाद
- 2. गुलामगिरीचा कालखंड
- 3. सामंतवाद
- 4. भांडवलवाद
- 5. साम्यवाद

# मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

- आदिम अवस्था –मार्क्स च्या मते ही मानवी जीवनातील पहिली अवस्था होती .यात नैसर्गिक साधनांवर सर्वांची मालकी असल्यामुळे वर्ग व वर्ग संघर्ष नव्हता. त्यामुळे याला मार्क्स ने साम्यवादाचे युग म्हंटले आहे.पुढे कुटुंब व खाजगी संपत्तीचा उदय झाल्यानंतर उत्पादनांच्या साधंनांवरील मालकी हक्कावरून समाजात मालक व गुलाम हे दोन वर्ग निर्माण होऊन पुढची अवस्था म्हणजे गुलामगिरीचा कालखंड निर्माण झाला.

# मार्क्सचा द्‌वंद्‌वात्मक भौतिकवाद

- गुलामगिरीचा कालखंड ---ज्या वर्गाजवळ उत्पादनाची साधने व संपत्ती होती ,तो मालक वर्ग बनला व त्यांच्या साधनांवर राबणारा वर्ग हा गुलाम किंवा दास बनला.गुलाम वर्ग मालकासाठी राबत असे व त्यांना केवळ उदरनिर्वाहा पुरती मजुरी मिळत असे.अतिरिक्त नफा मात्र मालकाच्या खिशात जात असे.मालक वर्ग अश्या प्रकारे मजुरांचे शोषण करीत असल्यामुळे मालक विरुद्ध गुलाम असा संघर्ष या कालखंडात उभा राहिला व यातून गुलामगिरीचा कालखंड संपुष्टात त्यातून नवी समाजरचना उभी राहिली ती म्हणजे सामंतवाद किंवा सरंजामशाहीची अवस्था निर्माण होते.

# मार्क्सचा द्‌वंद्‌वात्मक भौतिकवाद

- सामंतवाद ---स्वामी मजुरांच्या वर्गसंघर्षातून राजसत्ता निर्माण झाली. राजेशाहीने राज्य स्थापन करून काही लोकांची त्यासाठी मदत घेतली.मोबदल्यात त्यांना जमिनी दिल्या.ह्या व्यक्ति सामंत किंवा जमीनदार बनल्या.त्यांच्या शेतीवर राबणारा मजूर वर्ग त्यांच्या गुलाम बनल्या .सामंतशाहीत मजुरांचे खूप शोषण झाले.त्यातून सामंत विरुद्ध मजूर असा संघर्ष निर्माण होऊन या संघर्षात सामंतशाही नष्ट झाली.पुढील काळात उदयोगिक क्रांति आणि तांत्रिक व विज्ञानातील प्रगतीमुळे आर्थिक उत्पादनाच्या क्षेत्रात आमुलाग्र परिवर्तन घडून आले. व त्यातून भांडवलशाही उदयास आली.

# मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

- भांडवलवाद ----1688 च्या इंग्लंड मधील रक्तहीन क्रांतिमुळे व 1789 च्या फ्रान्सच्या क्रांतिमुळे विज्ञानाचे नवीन आविष्कार निर्माण झाल्यामुळे उत्पादनाची नवीन साधने निर्माण झाली. श्रीमंत व्यापारी वर्गाने त्याचा फायदा उठवून उत्पादनाच्या साधनावर एकाधिकार निर्माण केला.त्यामुळे समाजातील जुनी व्यवस्था बदलली व नवीन युगाचा प्रारंभ झाला.नवनवीन यंत्रे निर्माण होऊन उद्योगाचे केंद्रीकरण झाले मोठ्या उद्योगधंद्यामुळे लहान उद्योगधंदे नष्ट झाले.मोठ्या उद्योग धंद्यातील उत्पादनाची साधने ज्यांच्याजवळ होती ते भांडवलदार झाले.श्रमिक वर्ग पोटासाठी भांडवलदारांवर अवलंबून राहू लागला

# मार्क्सचा द्‌वंद्‌वात्मक भौतिकवाद

- या अवस्थेत अधिक काम करून घेऊन, कमी पारिश्रमिक देऊन भांडवलदारांकडून श्रमिकांची पिळवणूक सुरू झाली. शोषण असह्य झाल्यामुळे भांडवलदार विरूद्ध श्रमिक असा संघर्ष निर्माण होऊन ह्या अवस्थेत तो पराकोटीला पोचला.व यातूनच अंतरिम साम्यवादाची अवस्था निर्माण झाली.

# मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

- साम्यवाद – भांडवलशाहितील श्रमिकांच्या अतोनात शोषणामुळे श्रमिक वर्ग भांडवलदाराविरुद्ध संघर्ष करून भांडवलशाही समाप्त केली जाते. परंतु साम्यवाद प्रस्थापित होण्या अगोदर मध्ये एक अंतरिम अवस्था निर्माण केली जाते ज्याला समाजवादाची अवस्था मार्क्स म्हणतो .जी अवस्था आधुनिक समाजवादापेक्षा वेगळी आहे.ज्यात श्रमिकांची हुकुमशाही निर्माण केली जाते वर्गविहीन समाज निर्मितीसाठी भांडवलदारांचे पुर्णपणे दमन केले जाते. व श्रमिकांच्या ह्या हुकूम शाहीची परिणीती साम्यवादात होते. या अवस्थेत कोणताही वर्गभेद रहात नाही, धर्म रहात नाही

# मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

- राज्यही रहात नाही. ह्या अवस्थेत प्रत्तेकाला काम राहील जो जितके काम करेल तितकेच त्याला पारिश्रमिक मिळेल. जो काम करणार नाही त्याला वेतन दिले जाणार नाही. अश्या प्रकारे साम्यवादी अवस्थेत सर्वत्र स्वातंत्र्य समता व सुखाचे वातावरण निर्माण होईल .
- मार्क्सच्या मते आजपर्यंतचा इतिहास म्हणजे वर्गसंघर्षाचा इतिहास आहे परस्पर विरोधी वर्गांच्या संघर्षातून विकास होत गेला. वर्ग संघर्षाच्या परिणामातून शेवटी साम्यवादी व्यवस्था निर्माण होईल.

# इतिहासिक भौतिकवादावरील टीका-----

1) मार्क्स ने केवळ आर्थिक तत्वेच परिवर्तनाला कारणीभूत होतात असे या सिद्धांतातून म्हटले आहे.परंतु हे योग्य नाही. मानवी जीवनातील रागद्वेष ,धार्मिक विरोध व देशप्रेम ह्या भावनांनी इतिहास घडविल्याचे दाखले पुराणात आढळतात. आध्यात्मिक ,नैतिक,मानसिक,सांस्कृतिक ,वैचारिक इत्यादि घटक देखील मानवी जीवनाला प्रभावित करतात.

# मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

2) मार्क्सने प्रत्तेक अवस्थेत समाजात फक्त दोनच घटक असतात असे म्हंटले आहे.जे चुकीचे आहे. समाजात दोन वर्ग प्रबळ असू शकतात ,मात्र या वर्गासोबत एक तिसरा वर्ग मध्यम वर्ग ही असतो त्याकडे मार्क्स ने दुर्लक्ष केले आहे. व हा वर्ग समाजात संतुलन कायम ठेवत असतो.

# मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

3) उत्पादन पद्धतीतील बदलामुळे समाजात परिवर्तन होते .असे मार्क्स ने म्हंटले आहे. परंतु बऱ्याचदा आकस्मिक कारणे देखील परिवर्तनासाठी कारणीभूत ठरतात तिकडे मार्क्सने दुर्लक्ष केले आहे.

4) मार्क्स ने या सिद्धांतात राज्यविहीन समाजाचे केलेले वर्णन काल्पनिक वाटते कारण साम्यवादी क्रांती नंतरही चीन,रशिया ची राज्ये नष्ट झाली नव्हती

# मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

5) मार्क्स ने वर्गसंघर्षाला अतोनात महत्व दिले आहे. परंतु त्यातून समाजाचे विघटन होण्याचीच शक्यता अधिक असते.

6) मार्क्स ने या सिद्धांतातून धर्म नष्ट करण्यात येईल असे म्हंटले आहे. परतू या ठिकाणी तो एक गोष्ट विसरला आहे की भौतिक सुखाप्रमाणे मनुष्याला आध्यात्मिक सुखाचीही लालसा असते.

# मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

7) या सिद्धांतानुसार मार्क्स उत्पादन पद्धती सामाजिक संबंध निश्चित करते असे जे म्हंटले आहे ते चुकीचे आहे. कारण सामाजिक संबंधांच्या निश्चितीसाठी इतर अनेक घटकही कारणीभूत असतात.

8) शेवटी असेच म्हणावे लागते की मार्क्सने इतिहासाची व्याख्या आपल्या विचारांच्या समर्थनार्थ केली आहे.

समाप्त